वाचाः

१. जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र स्थापन करण्याबाबत मॅन्युअल
२. मा. सचिव, सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे अ.शा. पत्र क्रं.२२-३७ (२)/२०१०-डीडी ॥ दिनांक ०९.०६.२०१०.
३. मा. अध्यक्ष, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या व्यवस्थापन समिती तथा जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे आदेश क्रं.जिसकअ/जिप/अपंग/डिडिआरसी/मान्यता/डॉ.वि.पा.फौं./२०१८-१९/२५३० दि. २४.०८.२०१८.
४. उपसंचालक, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन, वडगांव गुप्ता (विळद घाट), पोस्ट-एम.आय.डी.सी., अहमदनगर यांचे पत्र क्रं.डी.व्ही.पी.एफ/डी.डी.आर.सी/२०२२/२३१२ दिनांक २३.०८.२०२२.
५. जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या (DDRC) व्यवस्थापनासाठी जिल्हा व्यवस्थापन समितीची बैठक दिनांक २०.०९.२०२२.

---

जा.क्र.जिसकअ/जिप/दिव्यांग/DDRC/मान्यता/डॉ.वि.पा.फा./२०२२-२३ ९५५१ दिनांक २१/१०/२०२२.
२१/१०/२०२२

## आदेश

उपोदघातातील वाचा क्रमांक १ अन्वये मॅन्युअल व वाचा क्रमांक २ मधील केंद्र शासनाच्या अर्धशासकीय पत्रान्वये जिल्हास्तरावर जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र (DDRC) स्थापन करण्याचे निर्देश दिलेले आहेत. सदर जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र स्थापन करण्यासाठी जिल्हास्तरावर मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा व्यवस्थापन समिती कार्यान्वित आहे. या केंद्रामार्फत दिव्यांग व्यक्तींच्या सर्वागिण विकासाकरीता जनजागृती, सर्व्हेक्षण, निदान, सल्ला मार्गदर्शन, दिव्यांगासाठी कृत्रिम अवयव व साधने, दिव्यांगांच्या शस्त्रक्रिया, दिव्यांगाचे दाखले तसेच शिक्षण व पुनर्वसन, नोकरी इ. सेवा पुरविण्याची तरतुद आहे.

उपोदघातातील वाचा क्रमांक ३ अन्वये अध्यक्ष, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, व्यवस्थापनासाठी व्यवस्थापन समिती तथा जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे आदेश क्रं.जिसकअ/जिप/अपंग/डिडिआरसी/मान्यता/ डॉ.वि.पा. फौं. /२०१८-१९/२५३० दि. २४.०८.२०१८ अन्वये डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन, वडगांव गुप्ता (विळद घाट), पोस्ट-एम.आय.डी.सी., अहमदनगर, ता. जिल्हा अहमदनगर या संस्थेस जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, विळद घाट, ता. जिल्हा अहमदनगर चालविण्याकरीता दिनांक २४.०८.२०१८ पासून पुढील चार वर्षाकरीता म्हणजेच दिनांक २४.०८.२०२२ पर्यंत मान्यता प्रदान करण्यात आलेली होती.

जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, विळदघाट, ता. जिल्हा अहमदनगर या उपक्रमाची वैधता दिनांक २४.०८.२०२२ रोजी संपुष्ठात आल्याने उपरोक्त संदर्भ क्रमांक ४ अन्वये उपसंचालक, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन, वडगांव गुप्ता (विळद घाट), पोस्ट-एम.आय.डी.सी., अहमदनगर यांनी जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, विळदघाट, ता. जिल्हा अहमदनगर या उपक्रमास पुढील मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त संदर्भ क्रमांक ४ अन्वये प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त संदर्भ क्रमांक ५ अन्वये जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, व्यवस्थापनासाठी व्यवस्थापन समिती तथा जिल्हाधिकारी, अहमदनगर समितीची बैठक

दिनांक २०.०९.२०२२ रोजी आयोजित करून सदर बैठकिमध्ये अध्यक्ष, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या व्यवस्थापन समिती तथा जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, विळदघाट, ता. जिल्हा अहमदनगर केंद्रास दिनांक २४.०८.२०२२ पासून पुढील कायमस्वरूपी मान्यता प्रदान करण्यास मी डॉ. राजेंद्र भोसले, अध्यक्ष, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, व्यवस्थापनासाठी व्यवस्थापन समिती तथा जिल्हाधिकारी, अहमदनगर मान्यता प्रदान करीत आहे.

(राजेंद्र भोसले)
अध्यक्ष,
जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र,
व्यवस्थापनासाठी व्यवस्थापन समिती
तथा जिल्हाधिकारी, अहमदनगर

**प्रति,**
उपसंचालक, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन, वडगांव गुप्ता (विळद घाट), पोस्ट-एम.आय.डी.सी., अहमदनगर.

**प्रतः माहितीस्तव सविनय सादर**
मा. आयुक्त, दिव्यांग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**अटी शर्तीः**

१. जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र (DDRC) अंतर्गत दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या दिव्यांगत्वानुरूप संदर्भिय सेवा देणे बंधकारक राहिल.
२. जिल्हा व्यवस्थापन समितीचा निर्णय आपणांवर बंधनकारक राहिल.
३. जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र (DDRC) अंतर्गत दिव्यांगांच्या पुनर्वसनात्मक करित असलेल्या कामकाजाचा अहवाल दर तीन महिण्याला जिल्हा व्यवस्थापन समितीपुढे सादर करणे बंधनकारक राहिल.
४. जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्रामध्ये दिव्यांगांच्या हितावह कामकाज होत नसल्याबाबत अथवा त्या बाबतीत तक्रारी प्राप्त झाल्यास अथवा उपक्रमाचे कामकाज तपासणीमध्ये समाधानकारक आढळुन न आल्यास परिस्थिती परत्वे गठित करण्यात आलेल्या समितीस जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र (DDRC) केंद्राची मान्यता रद्द करण्याचे अधिकार राखुन ठेवण्यात येत आहेत.